अहवाल क्रमांक : १७३

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# सत्ताविसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक     जून, २०१९ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# सत्ताविसावा अहवाल

# पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. ***रिक्त
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. ***रिक्त
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
२९. *श्री. किशोर दराडे, वि.प.स.
३०. **श्री. निलय नाईक, वि.प.स.
३१. **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सहसचिव (२) (का)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

*श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

**श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

***डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. अॅड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

# पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा सत्ताविसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्याउलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधिमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्त्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दिष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरूरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती

मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परीक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढते वेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठित झालेल्या समितीने सोलापूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने सोलापूर जिल्हा परिषदेस दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी भेट देऊन डॉ. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठित झालेल्या समितीने सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, सोलापूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना, श्री. आर.व्ही.पानसे, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, श्री. ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. र.आ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. म.रं.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. कि.पां.वडते, उप सचिव, महसूल व वन विभाग, श्री. विकास कदम, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ. विजय

कुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठित झालेल्या समितीने दिनांक ४ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जून, २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | सोलापूर जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत | १ |
| (२) | दोन | पंचायत समिती, मंगळवेढा अंतर्गत माळेवाडी, सलगर व लवंगी येथील निकृष्ट दर्जाच्या बंधाऱ्याबाबत | ३ |
| (३) | तीन | पंचायत समिती, उत्तर सोलापूर अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराबाबत | ५ |
| (४) | चार | पंचायत समिती, बार्शी अंतर्गत वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकूण वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरलेली व रिक्त पदे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भात | ७ |
| (५) | पाच | उत्तर सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत केलेली मागणी<br>पंचायत समिती, उत्तर सोलापूर | १० |
| (६) | | **परिशिष्ट**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | १३ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, सोलापूर (प्रशासन)

### सोलापूर जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सोलापूर जिल्ह्यातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्या सोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात जिल्हा परिषद सदस्य यांनी समितीस जलयुक्त शिवार योजनेबाबत विशद केले की, एका वर्षात ६० ते ७० शासन निर्णय सरकारमार्फत काढण्यात आले. असे सतत शासन निर्णय बदलत राहिले तर या योजनेंतर्गत कामेच होणार नाहीत. शासन निर्णयाद्वारे कामांमध्ये सुलभता आणली गेली पाहिजे, परंतु येथे परिस्थिती उलट होत आहे. या कारणामुळे या वर्षी कोणत्याही कामास सुरुवात होऊ शकली नाही. डी.एस.आर. किंवा इतर बाबी निश्चित करण्यात याव्यात. ग्रामीण विकासासंदर्भातील धोरणात्मक नियोजनामध्ये अडथळा निर्माण होऊ नये असे सदस्यांनी मत मांडले. यावर समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी शासनाचे अधिकारी समितीला सहाय्य करण्यासाठी समितीच्या दौऱ्यात समिती समवेत उपस्थित असतात. परंतु आजच्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी ग्रामविकास विभागाचे अधिकारी आजच्या बैठकीस उपस्थित नसल्यामुळे समितीने याबाबत नाराजी व्यक्त केली व यापुढील अनौपचारिक बैठकीच्या वेळी देखील शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीच्या बैठकीच्या वेळी उपस्थित रहावे असे निदेश दिले.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, गेल्या सहा महिन्यांमध्ये जलयुक्त शिवार योजनेसंदर्भात निघालेल्या शासन निर्णयांच्या प्रती समितीला सादर कराव्यात. जेणेकरून समितीला देखील त्याचा अभ्यास करता येईल. तसेच विधानसभेमध्ये हा विषय मांडताना समितीला त्याचा फायदा होईल व याबाबत जलसंधारण सचिवांची साक्ष लावता येईल. तद्नंतर समितीने निदेश दिले की, आपण वर्षभरामध्ये ६० ते ७० शासन निर्णय निर्गमित झाल्याचे सांगितले. शासनाच्या लोकप्रिय कामकाजा संदर्भातील हे निर्णय आहेत. याबाबत जलसंधारण सचिवांना साक्षीसाठी बोलविण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जलयुक्त शिवार योजनेसंदर्भात एका वर्षात ६० ते ७० शासन निर्णय सरकारमार्फत काढण्यात आले, शासन निर्णयाद्वारे कामात सुलभता आणली गेली पाहिजे, तथापि, सन २०१७-१८ या वर्षामध्ये कोणत्याही कामास सुरुवात होऊ शकली नाही त्यामुळे डी.एस.आर. किंवा इतर बाबी निश्चित करण्याच्या दृष्टीने ग्रामविकास संदर्भातील धोरणात्मक नियोजन करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**

दिनांक १३ जुलै, २०१७ चे शासन पत्रान्वये निश्चित करून दिलेल्या वेळापत्रकानुसार, कामांची प्रक्रिया पूर्ण होण्यास झालेल्या विलंबाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

विभागाकडील आराखड्यात प्रस्तावित करणेत आलेल्या एकूण ६८१ कामांपैकी २०२ कामे पाझर तलाव दुरूस्तीची, २७ कामे गाव तलाव दुरूस्तीची, १३ कामे सिमेंट बंधारे दुरूस्तीची व ५७ कामे कोल्हापुरी पद्धती बंधारे दुरूस्तीची अशी एकूण २९९ कामे ही दुरूस्ती स्वरूपाची आहेत. सचिव, जलसंधारण विभाग यांचेकडील दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ चे शासन पत्रान्वये, सन २०१७-१८ चे आराखडे तयार करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. सदर पत्रामधील मुद्दा क्र. १० अन्वये, दुरूस्ती, संदर्भात मापदंड निश्चित करून देण्यात येत असून दुरूस्तीच्या अंदाजपत्रकांना मापदंड निश्चित करून दिल्यानंतरच मान्यता द्यावी अशा सूचना होत्या. दुरूस्तीच्या कामासाठीचे मापदंड दिनांक १७ आक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये, निश्चित करून देण्यात आले. दुरूस्तीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ चे पत्रान्वये देण्यात आल्या. मृद व जलसंधारण विभागाची सन २०१७-१८ ची सामाईक दरसूची दिनांक २० डिसेंबर, २०१७ अन्वये निर्गमित करणेत आली व सदरची दरसूची दिनांक २० डिसेंबर, २०१७ पासून अंमलात आली. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग यांचेकडील दिनांक १ जानेवारी, २०१८ चे परिपत्रकान्वये कामांचे अंदाजपत्रकांमध्ये वस्तू व सेवा कर (जी. एस. टी.) अंतर्भुत करणेबाबत सूचना देण्यात आल्या.

सदरच्या वेळोवेळी प्राप्त सूचनांचा आदरपूर्वक विचार करून अंदाजपत्रके तयार करण्यात आली / तयार असलेली अंदाजपत्रके अद्ययावत करण्यात आली. यामुळे साहजिकच सदरच्या प्रक्रियेमध्ये वेळ लागला.

विभागाकडील प्रस्तावित आराखड्यामध्ये एकूण १५६ सिमेंट बंधारे/ रिचार्ज बंधारे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. सदर बंधाऱ्यांपैकी आर्थिक मापदंड बसणेसाठी आवश्यक ते नाला खोलीकरण / रूंदीकरणाची १३५ कामे व इतर अस्तित्वातील बंधाऱ्याच्या ठिकाणी ८६ अशी एकूण २२१ नाला खोलीकरण / रूंदीकरणाची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सिमेंट बंधारे बांधकामाबाबत दिनांक २३ जून, २०१७ रोजीचा शासन निर्णय, नाला खोलीकरण/ रूंदीकरणाबाबत दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजीचे परिपत्रक व दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ चे शासन पूरकपत्रक, मा. संचालक, मृद व जलसंधारण यांचेकडील दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ चे पत्रान्वये निर्गमित उपचार नकाशे, आयुक्त मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद यांचेकडील दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ चे परिपत्रकान्वये, रिचार्ज बंधारे/ स्टोरेज बंधारे बांधकामाबाबत निर्गमित सूचना, मृद व जलसंधारण विभागाची सन २०१७-१८ ची सामाईक दरसूची दिनांक २० डिसेंबर, २०१७ अन्वये निर्गमित करण्यात आली व सदरची दरसूची दिनांक २० डिसेंबर, २०१७ पासून अंमलात आली. मा. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग यांचेकडील दिनांक १ जानेवारी, २०१८ चे परिपत्रकान्वये कामांचे अंदाजपत्रकांमध्ये वस्तू व सेवा कर (जी. एस. टी.) अंतर्भुत करणेबाबत सूचना देण्यात आल्या. सदरच्या वेळोवेळी प्राप्त सुचनांचा आदरपूर्वक विचार करून अंदाजपत्रके अद्ययावत करण्यात आली त्यामुळे साहजिकच सदरच्या प्रक्रियेमध्ये वेळ लागला.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, सन २०१७-१८ मध्ये कोणत्याही कामाला सुरुवात न झाल्यामुळे डीएसआर किंवा इतर बाबी निश्चितीकरणाच्या दृष्टीने ग्रामविकास विभागासंदर्भातील धोरणात्मक नियोजन करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली, यावर उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, या संदर्भात निकष ठरविण्यासंबंधी जलसंपदा विभागाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी निर्णय घेतला होता. त्यामध्ये सी.ए.जी. च्या आर्थिक मापदंडासंबंधी असलेल्या निकषामध्ये दुरूस्ती करण्यात आली. तसेच कामाला विलंब झाल्यासंबंधी देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतर सदर कामांना ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्या मुदतीमध्ये सर्व कामे पूर्ण झालेली आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्ह्यातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ग्रामविकास व जलसंधारण विभागातर्फे जलयुक्त शिवार योजनेबाबत एका वर्षात ६० ते ७० शासन निर्णय काढण्यात आले त्यामुळे सतत शासन निर्णय बदलत राहिले तर जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे होणार नाहीत, वास्तविक पहाता शासन निर्णयाद्वारे कामामध्ये सुलभता आणली गेली पाहिजे, परंतु शासन निर्णय बदलत राहिल्यामुळे कोणत्याही कामास सुरुवात होऊ शकली नाही. या करीता डी.एस.आर. किंवा इतर बाबी निश्चित करण्यात याव्यात जेणेकरून ग्रामीण विकासासंदर्भातील धोरणात्मक नियोजनामध्ये अडथळा निर्माण होऊ नये.

**एकाच वर्षात एकाच विषयाबाबत वारंवार शासन निर्णयात बदल करणे ही बाब समितीला अनाकलनीय वाटली. त्यामुळे संबंधित योजनेच्या कामांना विलंब झाला. यात शासनाचा निधी अडकून पडल्याने शासनाच्या योजनेची वेळेवर अंमलबजावणी होऊन त्याद्वारे योजना राबवून फलश्रुती होऊ शकली नाही. परिणामी त्याचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना होऊ शकला नाही. जलयुक्त शिवार योजना ही शासनाची नवीन व अतिशय महत्त्वाची योजना असून त्यासाठी शासनाद्वारे देण्यात आलेल्या निधीचा वेळेत उपयोग होऊ शकला नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असून सोलापूर जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी अनौपचारिक चर्चेच्या वेळी व्यक्त केलेल्या मतानुसार वारंवार शासन आदेश निर्गमित होऊन त्याद्वारे योजनेची अंमलबजावणी होण्यात येत असलेल्या अडचणी दूर करण्यासंदर्भात यापुढील काळात जलसंधारण विभागाच्या या अतिशय महत्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी करताना उक्त कामाचा शासन निर्णय निर्गमित करताना त्यात कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत. तसेच कामाच्या अंमलबजावणीत सुसूत्रता ठेवून योजनेतील सर्व प्रकारची कामे एकाच वेळी पूर्णपणे कशी पूर्ण केली जातील याबाबत सुसूत्रता येणाच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सोलापूर (प्रशासन)

### पंचायत समिती, मंगळवेढा अंतर्गत माळेवाडी, सलगर व लवंगी येथील निकृष्ट दर्जाच्या बंधाऱ्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ७ , ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने संबंधितांना पुढील प्रमाणे निदर्शनास आणून दिले की, माळेवाडी, सलगर, लवंगी येथील लघु पाटबंधारे अंतर्गत बांधण्यात आलेले सिमेंट बंधाऱ्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. समितीने गावातील शेतकरी व ग्रामस्थांसोबत बंधाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. माळेवाडी येथील बंधाऱ्याच्या खालील बाजूस पी.व्ही.सी. पाईप्स टाकलेले असल्यामुळे पाण्याचा एक थेंबही बंधाऱ्यामध्ये नसल्याचे दिसून आले, सर्व पाणी वाहून जात आहे. पाणी अडविण्याचा मूळ उद्देश या कारणाने सफल होत नाही. त्यामुळे या कामावर झालेला खर्च व्यर्थ ठरत आहे. माळेवाडी, सलगर व लवंगी येथील अशा प्रकारे झालेल्या बंधाऱ्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर शासन नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याची शिफारस ही समिती करीत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, मंगळवेढा अंतर्गत माळेवाडी, सलगर व लवंगी येथील निकृष्ट दर्जाच्या बंधाऱ्याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास शासन निर्णयानुसार संबंधितांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**

मंगळवेढा तालुक्यातील मौजे माळेवाडी, सलगर व लवंगी येथील बांधण्यात आलेले सिमेंट बंधाऱ्याचे कामाची दोन उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांचेकडून चौकशी केली आहे. मौजे माळेवाडी, ता. मंगळवेढा, येथील (सावकार मळा) सिमेंट बंधारा सन २०१२-१३ मध्ये पूर्ण झालेला आहे. सदर बंधाऱ्याचे नाला तळपातळीतून १५० मि.मि. व्यासाचे दोन पीव्हीसी पाईप घालण्यात आले होते. सन २०१४-२०१५ मध्ये सदरचे पीव्हीसी पाईप संधानकाने (concrete) भरून बुजवण्यात आले आहेत. सदर बंधाऱ्यातून गळती होत असल्याने बंधाऱ्याचे आतील बाजूस आरसीसी पडदी टाकून काम दुरूस्त करणे आवश्यक आहे, असे सदर चौकशी अहवालामध्ये नमूद आहे. सदर काम करतेवेळीचे शाखा अभियंता श्री. एस.जी. बडवे होते व ते मयत आहेत तसेच सदर काम करतेवेळीचे उप अभियंता श्री. वझरकर हे सेवानिवृत्त झाले आहेत. सदर कामांबाबत ग्रामपंचायत माळेवाडी व सेवानिवृत्त उप अभियंता श्री. वझरकर यांना सदर बंधाऱ्याची दुरूस्तीची रक्कम रुपये ९५,०००/- इतकी भरणा करणेबाबत पत्र क्र. १६१८, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ अन्वये कळविले आहे.

२) मौजे लवंगी, ता. मंगळवेढा (पाटील वस्ती) येथील सिमेंट बंधाऱ्यास गळती नसून बंधारा सुस्थितीत आहे असे अहवालामध्ये नमूद आहे.

३) मौजे सलगर खुर्द, ता. मंगळवेढा येथील सिमेंट बंधाऱ्यातून गळती नसल्याचे अहवालामध्ये नमूद आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, मंगळवेढा पंचायत समितीचा मुद्दा आहे. उक्त प्रकरणातील शाखा अभियंता केव्हा मयत झाले, उप अभियंता केव्हा सेवानिवृत्त झाले, त्यांच्यावर कारवाई करण्यास विलंब झाला आहे काय, असल्यास कोणी विलंब केला, यावर उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू शाखा अभियंता सन २०१४ मध्ये मयत झाले व उप अभियंता सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत.

समितीने विचारणा केली की, सदरहू कालावधीमध्ये संबंधितांवर कारवाई का करण्यात आली नाही, यावर उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू प्रकरणातील उप अभियंता सेवानिवृत्त झालेले असले तरी त्यांच्या विरुद्ध

नियमानुसार कारवाई करता येईल. सदरहू बंधारा दुरुस्तीच्या कामाच्या खर्चाची ९५ हजार रुपये रक्कम भरणा करणे प्रकरणी उप अभियंता यांना दिनांक २९ ऑक्टोबर २०१८ रोजी नोटीस देण्यात आली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, अद्यापपर्यंत उप अभियंता रकमेचा भरणा केला नाही. सदरहू प्रकरणी ३ महिन्यापूर्वी पत्र दिलेले आहे. समितीने सचिवांची साक्ष लावल्यामुळे संबंधितास पत्र दिले आहे काय, यावर उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू अधिकाऱ्याने रक्कम भरली नाही तर नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करता येईल. यावर समितीने नाराजी व्यक्त करीत विचारणा केली की,आतापर्यंत कारवाई का केली नाही, साक्ष लागण्याची वाट पाहत होता काय, तात्काळ कारवाई का केली नाही, समितीने कधी भेट दिली होती, यावर उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, माहे फेब्रुवारीमध्ये समितीने भेट दिली होती. यावर समितीने विचारणा केली की, एक वर्षाचा कालावधी पूर्ण होत आला तरी संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही. समितीने भेट दिली होती त्यावेळी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. यावर उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, उक्त प्रकरणी तातडीने कारवाई करण्यास सांगण्यात येईल.

तद्नंतर समितीने नाराजी व्यक्त करीत निदेश दिले की, समितीच्या कार्यवृत्तामध्ये नमूद करण्यात आले आहे की, एक महिन्यात आक्षेपार्ह प्रकरणी उत्तरे घेऊन कारवाई करून अहवाल सादर करण्यात यावा. तसेच जिल्हा परिषदेने कोणत्याही प्रकरणी कारवाई केली नसताना सर्व प्रकरणांमध्ये सहमत आहोत, असे नमूद करण्यात आले आहे असे समितीने असमाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायत समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, माळेवाडी, सनगर, लवंगी येथील लघु पाटबंधारे अंतर्गत बांधण्यात आलेले सिमेंट बंधाऱ्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून समितीने गावातील शेतकरी व ग्रामस्थांसोबत बंधाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली असता, माळेवाडी येथील बंधाऱ्याच्या खालील बाजूस पी.व्ही.सी. पाईप्स टाकलेले असल्यामुळे बंधाऱ्यामध्ये पाणी नसल्याचे दिसून आले सर्व पाणी वाहून जात असल्यामुळे पाणी अडविण्याचा मुळ उद्देश या कारणाने सफल होत नाही. त्यामुळे सदर कामावर झालेला खर्च व्यर्थ ठरत आहे त्यामुळे समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

**मौजे लवंगी तसेच मौजे सलगर खुर्द ता.मंगळवेढा येथील सिमेंट बंधाऱ्यातून गळती नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. तथापि, चौकशी अहवालानुसार मौजे माळेवाडी ता. मंगळवेढा येथील सिमेंट बंधाऱ्याचे आतील बाजूस आर.सी.सी. पडदी टाकून काम दुरूस्त करणे आवश्यक आहे. तत्कालिन शाखा अभियंता, श्री. एस.जी. बडवे सन २०१४ मध्ये मयत झाले आहेत. तसेच तत्कालिन उप अभियंता श्री. वझरकर हे सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. सदर कामाबाबत ग्रामपंचायत माळेवाडी व सेवानिवृत्त उप अभियंता श्री. वझरकर यांना सदर बंधाऱ्याची दुरुस्तीची रक्कम रुपये ९५,००० इतकी भरणा करणेबाबत दिनांक २९ ऑक्टोबर २०१८ रोजी पत्रान्वये कळविण्यात आले आहे. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून जिल्हा परिषद प्रशासनाने वेळीच कारवाई केली असती तर त्यात अनियमितता करणाऱ्यांवर कारवाई झाली असती. परंतु प्रशासनाने संबंधीतांवर वेळीच कारवाई केली नाही. त्यात शाखा अभियंता मयत झाल्याने व उप अभियंता सन २०१६ साली सेवानिवृत्त झाल्याचे सांगितले ही सुध्दा गंभीर बाब आहे. प्रशासनाने याबाबत कारवाई करण्यास खूपच दिरंगाई केली असल्याने समिती नाराजी व्यक्त करीत असून चौकशी अहवालात नमुद केलेली रक्कम अद्यापपर्यंत भरणा केलेली नसल्यास नियमानुसार सेवानिवृत्त तत्कालिन उप अभियंता यांचे विरुद्ध केलेल्या कारवाईची तसेच संबंधित उप अभियंत्याला एका वर्षाच्या विलंबाने नोटीस देण्याची कारणे कळवावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, सोलापूर (प्रशासन)

## पंचायत समिती, उत्तर सोलापूर अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराची काय परिस्थिती आहे, यावर प्रभारी गट शिक्षण अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत आहे. एनजीओ, महिला बचत गट यांचेकडे या प्रती आहेत.

समितीने विचारणा केली की, धान्यादी मालाचे नमुने आहेत काय, प्रयोगशाळेमध्ये चाचणीसाठी पुरवठा झाल्यानंतर शाळेतील नमुने मुख्याध्यापकांच्या सहीने पाठविले जातात काय, यावर प्रभारी गट शिक्षण अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, नमुने आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यात एकूण २८२ शाळा असून त्यापैकी २२२ शाळांमध्ये शालेय पोषण आहार दिला जातो.

समितीने विचारणा केली की, पुरवठादाराने निविदा भरताना जे नमुने दिले जातात ते शाळांमध्ये ठेवले जातात का, चाचणी अहवाल येण्यापूर्वी मालाचा वापर होतो का, यावर प्रभारी गटशिक्षणाधिकारी, यांनी समितीस विशद केले की, पुरवठा केल्यावर त्याच दिवशी मालाचा वापर केला जातो.

यावर समितीने निदेश दिले की, करारनाम्याप्रमाणे जोपर्यंत चाचणी अहवाल येत नाही तोपर्यंत त्या मालाचा वापर करता येत नाही. तोपर्यंत मुख्याध्यापकाने चांगल्या दर्जाची धान्यादी माल खरेदी करायचा असतो आणि त्याची रक्कम पुरवठाधारकाच्या देयकातून कपात करायची असते. करारनामा वाचायला आपल्याला वेळ मिळाला नाही असे एकंदरित दिसते. शासकीय प्रयोगशाळेचा अहवाल तुमच्याकडे आहे काय, यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, गटशिक्षणाधिकारी यांचेकडून समाधानकारकपणे उत्तर समितीला मिळत नाही, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. तसेच समितीला जो अहवाल सादर केला आहे तो सहा महिन्यापूर्वीचा आहे. यावर प्रभारी गटशिक्षणअधिकारी, यांनी समितीला चाचणी अहवाल सादर करतो असे आश्वासित केले.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, शालेय पोषण आहाराचा पुरवठा ठराविक मुदतीत व्हायला पाहिजे. त्याशिवाय त्याचा चाचणी अहवाल आल्याशिवाय मुलांना शालेय पोषण आहार दिला जाऊ नये अशी तरतूद आहे. असे असताना माहे सप्टेंबर महिन्यानंतरचा एकही चाचणी अहवाल आढळून आला नाही त्यामुळे पुरवठाधारकांना दिलेले सर्व पैसे अवैध आहेत. करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केलेला आहे. मुलांना निकृष्ट दर्जाचा आहार दिला गेलेला आहे, हे सिद्ध होते. यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाचे सचिव तसेच ग्रामविकास विभागाचे सचिव यांची साक्ष घेण्यात यावी. हे प्रकार सर्वच जिल्ह्यात होत असल्यामुळे सचिवांची साक्ष होईपर्यंत संबंधित ठेकेदाराचे देयक थांबविण्यात यावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती, उत्तर सोलापूर** अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराचा पुरवठा करीत असताना माहे सप्टेंबर, २०१७ नंतर एकही चाचणी अहवाल समितीला आढळून आलेला नाही, त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/ सुधायो/सोलापूर/३०७/२०१६-२०१७/५६९२ दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ व परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/सोलापूर/३०७/२०१७-२०१८/६१०९, दिनांक १६ डिसेंबर, २०१७ मधील तरतुदीनुसार धान्यादी मालाचे प्रयोगशाळा चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडून नियमितपणे प्राप्त करून घेतले जातात. उपरोक्त परिपत्रकातील तरतुदीनुसार पंचायत समिती उत्तर सोलापूर अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१७, डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८, माहे फेब्रुवारी २०१८ व मार्च २०१८ या वाटप कालावधीतील पुरवठादाराने पुरवठा केलेल्या धान्यादी मालाचे शासकीय प्रयोग शाळेतील चाचणी अहवाल त्या त्या वाटपाच्या कालावधीत प्राप्त करून घेण्यात आलेले आहेत. सदरचे चाचणी अहवाल या सोबत संलग्न करण्यात येत आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :—** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळाची वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे जिल्हानिहाय पुरवठेदार नियुक्त करण्यात येतात. नियुक्त पुरवठेदारासोबत करारनामा करण्यात येतो. सदर करारनाम्यातील तरतुदीनुसार पुरवठादाराने मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे तालुका निहाय नमुने प्रथम शासकीय प्रयोग

शाळेत पाठविण्यात येतात. सदर प्रयोगशाळा तपासणी अहवाल हा food safety and standard Act, 2006 मधील तरतुदी नुसार समाधानकारक प्राप्त झाल्यानंतरच मालाची देयके अदा करण्यात येतात.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, उत्तर सोलापूर अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराचा पुरवठा करीत असताना माहे सप्टेंबर, २०१७ नंतर एकही चाचणी अहवाल आढळून आलेला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विशद केले की, पुरवठा केलेल्या मालाचे शासकीय प्रयोग शाळेतील चाचणी अहवाल आहेत, स्वत: ते तपासले आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान पंचायत समिती, उत्तर सोलापूर अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराबाबत समितीच्या निदर्शनास आले की, उत्तर सोलापूर तालुक्यात एकूण २८२ शाळा असून त्यापैकी २२२ शाळांमध्ये शालेय पोषण आहार दिला जातो. शालेय पोषण आहाराकरिता धान्यादी मालाचा पुरवठा शाळांना केल्यानंतर धान्यादी मालाचे नमुने मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने प्रयोगशाळेमध्ये चाचणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तसेच पुरवठादाराने निविदा भरताना जे नमुने दिले जातात ते शाळांमध्ये ठेवणे आवश्यक आहे व करारनाम्यानुसार जोपर्यंत चाचणी अहवाल येत नाही तो पर्यंत त्या मालाचा शालेय पोषण आहार म्हणून वापर करता येत नाही. तथापि, धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचदिवशी त्याचा वापर केला असल्याचे दिसून आले, तसेच शासकीय प्रयोगशाळेमधील धान्यादी मालाचा नमुना पाठविण्यात आल्यानंतर जो चाचणी अहवाल प्राप्त होतो त्या चाचणी अहवालाची प्रत किंवा गुणवत्तेबाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून समितीला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे या प्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. त्यामुळे समितीचे असे स्पष्ट मत आहे की, प्रयोगशाळेमधील चाचणी अहवालाशिवाय शालेय पोषण आहाराचा पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांना अदा केलेली देयकाची रक्कम अवैध आहे. तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग करण्यात आला आहे. यावरून शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणारा पोषण आहार नियमानुसार प्रयोग शाळेतून चाचणी केल्यानंतर प्रयोग शाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदरचे अन्न खाण्यास योग्य असेल तर विद्यार्थ्यांना असा आहार वितरीत करणे आवश्यक आहे. परंतु या जिल्हा परिषदेतील तत्कालिन अधिकाऱ्यांनी हा नियम पाळला नाही. जर प्रयोग शाळेचा अहवाल नकारात्मक आला असता व त्यातून विद्यार्थ्यांच्या जीवितास काही धोका निर्माण झाला असता तर त्याची किती किंमत मोजावी लागली असती, हा विचार आहार तपासणी करणाऱ्यांनी केला नाही व त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केला आहे असे समितीला वाटते.

**सबब, या प्रकरणी प्रयोग शाळेतून आहाराचा नमुना तपासून न घेताच विद्यार्थ्यांना आहार दिल्याबाबत तत्कालिन जे अधिकारी दोषी असतील त्यांचे विरुद्ध सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधित पुरवठादार, मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे विरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, सोलापूर (प्रशासन)

## पंचायत समिती, बार्शी अंतर्गत वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकूण वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरलेली व रिक्त पदे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, बृहत आराखड्यात वाढीव प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर आहे काय, यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विशद केले की, बृहत आराखड्यात वाढीव प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर नसून उप केंद्र मंजूर आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू उपकेंद्र बांधून तयार आहे काय, यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विशद केले की, एक उपकेंद्र प्रगतीपथावर आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, वैराग प्राथमिक आरोग्य केंद्र आहे आणि ते ग्रामीण रुग्णालयासाठी मंजूर आहे काय, यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विशद केले की, यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे.

यावर समितीने निदेश दिले की, सदरहू प्रस्ताव मंजूर झालेला नाही. वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रात किती लोक आरोग्य तपासणीसाठी येतात व किती गावे घेतली जातात, एकूण वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे भरलेली आहेत आणि त्यापैकी किती रिक्त आहेत, वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भातील प्रस्ताव केंव्हा आणि कोणत्या तारखेला दिलेला आहे, सदरहू विषयाला न्याय मिळावा आणि तो जलदगतीने सोडविण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती, बार्शी** बार्शी पंचायत समिती, बार्शी अंतर्गत वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकूण वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे भरलेली आहेत आणि त्यापैकी किती पदे रिक्त आहेत तसेच वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भात प्रस्ताव केव्हा आणि कोणत्या तारखेला व कोणत्या वर्षी दिलेले आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

बार्शी पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, वैराग वैद्यकीय अधिकारी यांची दोन पदे मंजूर आहेत त्यापैकी एक बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी व एक स्थायी वैद्यकीय अधिकारी अशी दोन्ही पदे आज रोजी भरलेली असून सदर ठिकाणी सद्य:स्थितीत पद रिक्त नाही. वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भातील प्रस्ताव दि.२८ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेला आहे. निर्लेखनाबाबत कार्यकारी अभियंता बांधकाम १ यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या मान्यतेनुसार आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद सोलापूर यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, बार्शी पंचायत समिती अंतर्गत वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकूण वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे भरलेली आहेत आणि त्यापैकी किती पदे रिक्त आहेत. तसेच वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भात प्रस्ताव केव्हा दिलेला आहे, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची दोन पदे असून सद्य:स्थितीत एकही पद रिक्त नाही. इमारत निर्लेखित करण्यासंदर्भातील माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी देतील. पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. बांधकाम विभागाकडून तसे आदेश प्राप्त झालेले आहेत. त्यांच्याकडून सविस्तर प्रस्ताव घेऊन शासनाकडे निधीची मागणी करण्यात येईल.

यावर समितीने असा प्रश्न विचारला की, निधी मंजूर न होता इमारत पाडण्यास परवानगी कशी दिली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, यामध्ये दोन भाग आहेत. अनुशेषामधील प्राथमिक आरोग्य केंद्र असेल तर ते काम केंद्र

शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मधून घेण्यात येते आणि जिल्हा नियोजन विकास समिती मधून मंजूर झाले असेल तर जिल्हा नियोजन विकास समिती मधून घेण्यात येते. दोन्ही ठिकाणी सदरची बाब मंडळासमोर ठेवून मंजुरी घ्यावी लागते. यावर्षी जिल्हा नियोजन विकास समितीने दुसऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी दिलेली असल्यामुळे पुढील वर्षी वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचा प्रस्ताव ठेवण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, आपण अस्तित्त्वात असलेली इमारत पाडत आहात. त्यामुळे इमारत पूर्ण होईपर्यंत ते प्राथमिक आरोग्य केंद्र भाड्याच्या इमारतीमध्ये स्थलांतरित करावे लागेल. आरोग्य सेवा ही अत्यावश्यक आणि अतिमहत्त्वाची बाब आहे. जिल्हा नियोजन विकास समितीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी मिळते. आपण तसा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे दिलेला आहे काय, अत्यावश्यक बाब म्हणून मागणी केली आहे काय, इमारत पाडण्याची परवानगी दिली तर ते प्राथमिक आरोग्य केंद्र कुठे स्थलांतरित केले आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस माहिती दिली की, सदर इमारतीचे मूल्यांकन झालेले असून आजच्या घटकेला इमारत पाडण्याची कार्यवाही सुरू आहे.

समितीने विचारणा केली की, इमारत पाडण्याइतकी धोकादायक झालेली आहे काय, तसेच इमारत धोकादायक असेल तर तेथे कोणताही अनुचित प्रकार घडू शकतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेने बांधकाम विभागाकडे प्रस्ताव पाठविला असून त्यांनी मंजुरी दिलेली आहे. आता कार्यवाही सुरू होणार आहे.

यावर समितीने विचारणा केली की, इमारत बांधण्यासाठी निधी मंजूर झालेला नाही असे आपणच सांगितले. जर निधी असेल तर बांधकाम विभाग निविदा काढून इमारतीचे बांधकाम करू शकेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, बांधकाम विभागाकडून इमारत पाडण्याची परवानगी मिळालेली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, इमारत पाडल्यानंतर ते प्राथमिक आरोग्य केंद्र कुठे स्थलांतरित करणार आहात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, जिल्हा नियोजन समितीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र निवडण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नाही.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य समिती असते. त्या समितीमध्ये हा विषय तातडीने घ्यावा. तसेच आरोग्य ही अत्यंत तातडीची सेवा असल्यामुळे या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मांडून तो मंजूर करून घ्यावयास पाहिजे होता. त्याप्रमाणे आपण काही कार्यवाही केली काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, या संदर्भात जी यादी करण्यात आली त्यामध्ये पाच-सहा प्राथमिक आरोग्य केंद्रांची नावे पुढे आली होती. त्यामध्ये आंधळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे नाव पुढे आले. आंधळगाव येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र बांधायचे होते. यावर्षी वैराग प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजूर करण्यात येईल आणि काम देखील सुरू करण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, राज्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे रिक्त आहेत, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण १५४ पदे मंजूर आहेत त्यापैकी १२९ पदे कार्यरत आहेत तर २५ पदे रिक्त आहेत. तसे पाहिले तर तेथे आरोग्य विषयक चांगली परिस्थिती आहे. राज्यात ५४०० एमबीबीएसची पदे रिक्त आहेत. नोव्हेंबर महिन्यात ८७७ पदांची जाहिरात काढली होती.

यावर समितीने विचारणा केली की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस झालेल्या डॉक्टरांना ग्रामीण भागामध्ये तीन ते पाच वर्षे सेवा देणे अनिवार्य राहील अशी अट टाकावी. तसेच पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या अभ्यासक्रमासाठी असणाऱ्या डॉक्टरांना देखील ग्रामीण भागात काही वर्षे सेवा देण्याबाबत अनिवार्य करावे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, आपण म्हणता त्याप्रमाणे वैद्यकीय शिक्षण विभागाने तसा प्रस्ताव तयार केलेला आहे की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस झालेल्या डॉक्टरांना राज्य शासनाकडे इतकी वर्षे सेवा करावी लागेल. या संदर्भात विभाग नवीन कायदा करीत आहे. त्यामध्ये दोन भाग केलेले आहेत. जिल्हा परिषदेने पदे भरण्यासंदर्भात जाहिरात काढली होती परंतु न्यायालयात आरक्षणाचा विषय प्रलंबित असल्यामुळे पुढे जाता येत नाही. तरी देखील तयारी केली असून अर्ज जमा केलेले आहेत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना निदेश दिले की, वैद्यकीय ही अत्यावश्यक सेवा आहे आणि राज्यात आरोग्य विषयक भयानक परिस्थिती आहे ही बाब मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली असता मा. न्यायालय परिस्थितीनुरूप विषयाला मान्यता देऊ शकेल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने बार्शी पंचायत समितीला भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, बार्शी पंचायत समिती अंतर्गत वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्याच्या प्रस्तावाबाबत तसेच सदर आरोग्य केंद्रामधील रिक्त पदे भरण्याबाबत जलदगतीने कार्यवाही होत नसल्याप्रकरणी समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून असमाधान व्यक्त केले.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून अधिक माहिती जाणून घेतली असता व जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र वैराग येथील दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत त्यापैकी एक बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी व एक स्थायी वैद्यकीय अधिकारी अशी दोन्ही पदे भरलेली असून सदर ठिकाणी सद्य:स्थितीत पद रिक्त नाही. तसेच वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखित करण्यासंदर्भातील प्रस्ताव दिनांक २८ डिसेंबर,२०१८ रोजी म्हणजेच समितीने भेट दिल्यावर सुमारे १० महिन्यांनंतर प्रस्ताव दिलेला आहे. यावरून जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने आरोग्य केंद्राची इमारत पाडण्याइतकी असतानाही निर्लेखित करण्यास विलंबाने परवानगी दिली आहे. वास्तविक पहाता जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य समिती असते त्या समितीमध्ये हा विषय तातडीने घेऊन आरोग्य ही अत्यंत तातडीची सेवा असल्यामुळे या विषयाला सर्वोच्च प्राधान्य देऊन प्रस्तुत ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मांडून तो मंजूर करून घेणे आवश्यक होते. तसेच **सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण १५४ पदे मंजूर आहेत, त्यापैकी १२९ पदे कार्यरत आहेत तर २५ पदे अद्याप रिक्त आहेत व राज्यात एकूण ५,४०० एम.बी.बी.एस.ची पदे रिक्त असताना माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये एम.बी.बी.एस. करिता ८७७ पदांची जाहिरात काढण्यात आलेली आहे. उर्वरित ४,५२३ रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे. सबब, वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे तातडीने भरण्यासंदर्भात संबंधित विभागाने कार्यवाही करावी. उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. झालेल्या डॉक्टरांना ग्रामीण भागामध्ये तीन ते पाच वर्षे सेवा देणे अनिवार्य राहील अशी अट वैद्यकीय शिक्षण विभागातर्फे टाकण्यात यावी, तसेच वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या अभ्यासक्रमासाठी असणाऱ्या डॉक्टरांना देखील ग्रामीण भागात काही वर्ष वैद्यकीय सेवा देण्याबाबत अनिवार्य करावे, अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला पाठविण्यात यावा, तसेच सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीचे तात्काळ निर्लेखीकरण व स्थानांतरण करण्याची कार्यवाही तात्काळ होण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून सर्वसामान्य रुग्णांना त्यामुळे कोणतीही असुविधा निर्माण होणार नाही ही बाब विचारात घेवून शासनाने सदर इमारतीच्या निर्लेखनास तातडीने परवानगी देण्याची कार्यवाही करावी व असे निर्लेखनास केल्यानंतर नवीन इमारत व इतर साहित्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सोलापूर (प्रशासन)

## उत्तर सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत केलेली मागणी

## (पंचायत समिती, उत्तर सोलापूर)

पंचायती राज समितीने दिनांक ७ , ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाकरिता जागा केव्हा प्राप्त झाली तसेच सदरहू कामाची सद्य:स्थिती काय आहे, समितीने उत्तर सोलापूर तालुक्यातील किरे गावाला भेट दिली असता गावामध्ये आरोग्य उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे अशी गावकऱ्यांची मागणी आहे. त्या गावामध्ये दीड एकर जागा बी.एस.एन.एल. मोबाईल टॉवरकरिता दिली आहे. १००० चौ.फूट बांधकाम आहे. बीएसएनएलचा मोबाईल फोन आता इतिहासजमा झाला आहे. त्या ठिकाणी दुमजली आरोग्य केंद्र उभे करावे किंवा जागा रिक्त करून घ्यायची असेल तर गावठाण विस्ताराचा प्रस्ताव पाठविण्यात यावा. या विषयाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने काय प्रयत्न केले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, किरे गावाला मी स्वत: भेट दिली होती. तेथे उपकेंद्रामध्ये आरोग्य केंद्र चालविले जात आहे. ग्रामस्थांची मागणी होती की, आरोग्य केंद्राची इमारत झाली पाहिजे. तेथे जागेचा प्रश्न होता. गावठाणाची जागा होती, तेथे बीएसएनएलचा मोबाईल टॉवर आहे. लोक जागा द्यायला तयार आहेत. शासन निर्णयानुसार जागेची मर्यादा ठरलेली असून ठराविक रक्कम भरली पाहिजे. त्याकरिता दुमजली इमारत बांधावी असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. जागेबरोबर निधीची उपलब्धता झाली पाहिजे तसेच समितीची देखील मान्यता मिळाली पाहिजे. तेथे दुमजली इमारत बांधावी लागेल. गावठाण विस्ताराचा प्रस्ताव द्यावा लागेल. सर्वात पहिली अडचण जागेची आहे. जागेसाठी आम्ही पाठपुरावा करु. जिल्हाधिकाऱ्यांना भेटू. दुमजली इमारतीचे एस्टीमेट बनवून तेही पाठवू असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती, उत्तर सोलापूर** उत्तर सोलापूर तालुक्यातील किती गावात आरोग्य उपकेंद्र व्हावे अशी मागणी करण्यात आली आहे, सदर गावामध्ये बीएसएनएल मोबाईल टॉवरकरीता दीड एकर जागा वितरीत करण्यात आली आहे, त्याठिकाणी आरोग्य केंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे काय, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) उत्तर सोलापूर तालुक्यात सद्य:स्थितीत एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्र व १६ उपकेंद्र आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील एका गांवाने मौजे बी.बी. दारफळ यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मागणी केलेली आहे. उपकेंद्रासाठी सदर तालुक्यातून मागणी प्राप्त नाही. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १८ सप्टेंबर २०१८ ठराव क्र. १७८ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेसाठी मंजूरी घेऊन बृहत आराखडयात समाविष्ट करण्यात आले आहे.

(२) मौजे तिऱ्हे येथे नमूद केलेली बी.एस.एन.एल.ची जागा लेखी पत्राने सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत तिऱ्हे तालुका उत्तर सोलापूर यांच्याकडे मागणी केली आहे. ग्रामपंचायतीने ती जागा अद्याप जिल्हा परिषदेच्या नांवे केलेली नाही. जागा प्राप्त झाल्यानंतर मा. समितीच्या निर्देशाप्रमाणे रितसर अंदाजपत्रक तयार करून त्यानुसार बांधकाम करण्यात येईल.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** मौजे तिऱ्हे तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध न झाल्यामुळे तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र कवठे, तालुका उत्तर सोलापूर येथे स्थलांतर करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडून दिनांक ०३ जानेवारी २०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केला असून मौजे तिऱ्हे, तालुका उत्तर सोलापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे कवठे येथे स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर केला असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, उत्तर सोलापूर तालुक्यातील किती गावात आरोग्य उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे अशी मागणी करण्यात आली

आहे. सदर गावामध्ये बीएसएनएल मोबाईल टॉवरकरिता दीड एकर जागा वितरित करण्यात आली आहे. त्याठिकाणी आरोग्य केंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, मौजे तिऱ्हे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाले होते परंतु तेथे जागा उपलब्ध झाली नाही. जिल्हा नियोजन समितीने ठराव करून मौजे तिऱ्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे कवठे येथे स्थलांतर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव मंत्री महोदयांकडे देखील सादर केलेला आहे. आता मौजे तिऱ्हे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधायचे नाही असा जिल्हापरिषदेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

यावर समितीने असा प्रश्न उपस्थित केला की, मौजे तिऱ्हे येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता नाही का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, त्यांनी स्वत: तेथे भेट दिलेली आहे. उप केंद्राच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची स्वतंत्र इमारत उभारण्यात यावी अशी तेथील लोकांची मागणी आहे. परंतु ती जागा अपुरी पडत आहे. आपल्याकडे दुसरी जागा नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधू शकत नाही. लोकांचे म्हणणे आहे की, तेथे दुमजली इमारत बांधावी. परंतु दुमजली इमारत बांधावयाची असेल तर त्यासंदर्भात शासनाचा आराखडा असून तो शासनाकडून मंजूर करून घ्यावा लागतो. सध्या जी जागा आहे ती देखील त्यांच्या नावावर नाही. ती जागा बीएसएनएलच्या टॉवरसाठी राखून ठेवलेली आहे. ग्रामपंचायतींनी ठराव करून ती जागा टॉवरसाठीच निश्चित करून ठेवलेली आहे. आम्ही त्यांच्याकडे विनंती केली, परंतु त्यांनी त्याबाबत कार्यवाही केलेली नाही. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशी विचारणा केली की, मूळ जागा कोणाच्या नावावर आहे, यावर ती जागा ग्रामपंचायतीच्या नावावर आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीने मोबाईल टॉवरला जागा देण्यासंदर्भात ठराव केला असेल तर जिल्हा परिषदेने स्थायी समितीपुढे जाऊन तो ठराव रद्द करावा. आरोग्य सेवा हा महत्त्वाचा विषय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, तेथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे फक्त प्रा.आ.केंद्राची स्वतंत्र इमारत नाही. ती उप केंद्राच्या ठिकाणी होत आहे. लोकांचे म्हणणे आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी स्वतंत्र इमारत बांधून द्यावी. सध्या जी जागा आहे ती अपुरी पडत आहे. त्या जागेची त्यांनी स्वत: पाहणी केली आहे. ती जागा खूप छोटी आहे आणि गावामध्ये दुसरी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे बऱ्याच वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. टॉवरसाठी अर्धाएकर जागा आहे आणि एक एकर जागेवर अनधिकृत बांधकामे आहेत. परंतु मौजे कवठे येथील जागा सर्वांसाठी उपयुक्त आहे आणि तिऱ्हे ते कवठे हे अंतर फक्त तीन कि.मी.आहे. यावर समितीने निदेश दिले की, कवठे येथे लवकरात लवकर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारावे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, उत्तर सोलापूर पंचायत समिती अंतर्गत मौजे तिऱ्हे या गावातील गावकऱ्यांनी समितीला अशी मागणी केली की, आरोग्य उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे. सदर गावामध्ये दीड एकर जागा बी.एस.एन.एल. मोबाईल टॉवरकरिता दिली आहे त्यामध्ये १००० चौ.फूट बांधकाम आहे त्याठिकाणी दोन मजली आरोग्य केंद्र उभे करावे किंवा जागा रिक्त करून घ्यावयाची असल्यास गावठाण विस्ताराचा प्रस्ताव पाठविण्यात यावा. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी तेथील लोक जागा देखील द्यायला तयार आहेत. तद्नंतर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवाची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, उत्तर सोलापूर तालुक्यात सद्य:स्थितीत एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्र व १६ उपकेंद्र आहेत मौजे तिऱ्हे येथे नमूद केलेली बी.एस.एन.एल. ची जागा लेखी पत्राने सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत तिऱ्हे तालुका उत्तर सोलापूर यांच्याकडे मागणी केलेली आहे. ग्रामपंचायतीने ती जागा अद्याप जिल्हा परिषदेच्या नावे केलेली नाही. **जागा उपलब्ध न झाल्यामुळे तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र कवठे तालुका उत्तर सोलापूर येथे स्थलांतर करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव संचालक आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडून दिनांक ३ जानेवारी २०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केला असून मौजे तिऱ्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे कवठे येथे स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेला आहे. स्थानिक रहिवाशांनी मागणी करून देखील सदर प्राथमिक आरोग्य केंद्राबाबतचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

ज्या गावांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीचे प्रस्ताव शासनाने संमत केले त्या गावांसाठी केवळ त्या गावांत जागा उपलब्ध झाली नाही या कारणास्तव इतरत्र स्थानांतर करण्याची बाब समितीला अनाकलनीय वाटते. संबंधित अधिकाऱ्यांनी गावांतील प्रतिष्ठीत नागरिकांशी चर्चा करून जागेचा प्रश्न सोडविता आला असता किंवा एखादी मोक्याची जागा शासनाद्वारे अधिग्रहीत करून तेथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात आले असते. परंतु अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे उक्त गावांतील प्राथमिक आरोग्य केंद्र स्थानांतर होणे हा त्या गावांतील लोकांवर अन्याय आहे, असे समितीला वाटते.

**ग्रामस्थांनी मागणी केल्याप्रमाणे पुनर्विचार करून मौजे कवठे येथे आरोग्य केंद्र सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने लवकरात लवकर कार्यवाही पूर्ण करून मौजे कवठे व मौजे तिऱ्हे येथील ग्रामस्थांसाठी सर्व सोयीसुविधायुक्त प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

# परिशिष्ट
# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सोलापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(८) श्री. भारत भालके, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(१४) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव ;

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी ;

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्री. संजय शिंदे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, सोलापूर

(२) श्री. शिवानंद पाटील, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, सोलापूर

(३) श्रीमती रजनी देशमुख, सभापती, महिला व बाल कल्याण, जिल्हा परिषद, सोलापूर

(४) श्री. विजयराव डोंगरे, सभापती, अर्थ व बांधकाम, जिल्हा परिषद, सोलापूर

(५) श्रीमती शिला सचिन शिवशरन, सभापती, समाजकल्याण, जिल्हा परिषद, सोलापूर

(६) श्रीमती मायाक्का मायाप्पा यमगर, सभापती, सांगोला पंचायत समिती

(७) श्री. उमेश पाटील, सदस्य, जिल्हा परिषद, सोलापूर

(८) ॲड. सचिन देशमुख, सदस्य, जिल्हा परिषद, सोलापूर

(९) श्रीमती रेखा वैभव राऊत, सदस्य, जिल्हा परिषद, सोलापूर

**जिल्हा परिषद, सोलापूर :**

(१) डॉ. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी.व्ही.बनसोडे, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. गौतम जगदाळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्रीमती चंचल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(५) श्री. पी.एम.राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. विजय लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता),

(७) श्रीमती रश्मी खांडेकर, सहाय्यक आयुक्त (चौकशी), आयुक्त कार्यालय, पुणे,

(८) श्री. र.आ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

(९) श्री. अनिलकुमार नवाळे, प्रकल्प संचालक, जिग्राविय

(१०) श्री. एस.एस.बनसोडे, कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, क्र. १

(११) श्री. सो.गे.गायकवाड, कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, क्र. २

(१२) श्री. बी.के.नागरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१३) डॉ. के.एम.पराग, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१४) श्री. साहेबराव बेंदगुडे, कृषि विकास अधिकारी

(१५) डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१६) श्री. संजयकुमार राठोड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१७) श्री. सत्यवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१८) श्री. हे.सु.पाठक, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१९) श्रीमती रुपाली कोळी, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(२०) श्री. टी. एस. देवकर, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(२१) श्री. विलास भागवत, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

(२२) श्री. डी. बी. घुगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर

(२३) श्री. आर. आर. जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा

(२४) श्रीमती रंजना कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर-सोलापूर

(२५) श्री. जी. व्ही. बैरागी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माढा

(२६) श्री. प्रविण सिनारे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट

(२७) श्रीमती अर्चना वाघमळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला

(२८) श्री. प्रमोद काळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी

(२९) श्री. बाळासाहेब ढवळे-पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा

(३०) श्री. अजिंक्य टोळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ

(३१) श्री. प्रशांतसिंह मरोड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण-सोलापूर

(३२) श्री. एस.अे.मारकड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील सोलापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सोलापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(९) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१०) श्री. भारत भालके, वि.स.स.
(११) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१२) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१३) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१५) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१६) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव ;
(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी ;
(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी.

**जिल्हा परिषद, सोलापूर :**

(१) डॉ. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. पी. व्ही. बनसोडे, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. गौतम जगदाळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्रीमती चंचल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(५) श्री. पी.एम.राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)
(६) श्री. विजय लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(७) श्री. र.आ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(८) श्री. अनिलकुमार नवाळे, प्रकल्प संचालक, (जिग्रविय)
(९) श्री. एस.एस.बनसोडे, कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, क्र. १

(१०) श्री. सो.गे.गायकवाड, कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, क्र. २

(११) श्री. बी.के.नागरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१२) डॉ. के.एम.पराग, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. साहेबराव बेंदगुडे, कृषि विकास अधिकारी

(१४) डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१५) श्री. संजयकुमार राठोड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१६) श्री. सत्यवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री. टी.एस.देवकर, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(१८) श्री. डी.बी.घुगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर

(१९) श्री. आर.आर.जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा

(२०) श्रीमती रंजना कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर-सोलापूर

(२१) श्री. जी.व्ही.बैरागी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माढा

(२२) श्री. प्रविण सिनारे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट

(२३) श्रीमती अर्चना वाघमळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला

(२४) श्री. प्रमोद काळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी

(२५) श्री. बाळासाहेब ढवळे-पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा

(२६) श्री. अजिंक्य टोळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ

(२७) श्री. प्रशांतसिंह मरोड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण-सोलापूर

(२८) श्री. एस.अे.मारकड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात सोलापूर जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सोलापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(९) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१०) श्री. भारत भालके, वि.स.स.
(११) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१२) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१३) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१५) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१६) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(३) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी .

**जिल्हा परिषद, सोलापूर :**

(१) डॉ. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. पी. व्ही. बनसोडे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. गौतम जगदाळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्रीमती चंचल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(५) श्री. पी. एम. राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(६) श्री. विजय लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(७) श्री. संभाजीराव लंगोरे, उपायुक्त (आस्था), आयुक्त कार्यालय, पुणे
(८) श्री. विलास जाधव, सहाय्यक आयुक्त (विकास), आयुक्त कार्यालय, पुणे
(९) श्री. र. आ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१०) श्री. अनिलकुमार नवाळे, प्रकल्प संचालक, जिग्रविय

(११) श्री. एस. एस. बनसोडे, कार्यकारी अभियंता, जि. प. बांधकाम विभाग क्र. १

(१२) श्री. सो. गे. गायकवाड, कार्यकारी अभियंता, जि. प. बांधकाम विभाग क्र. २

(१३) श्री. बी. के. नागरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१४) डॉ. के. एम. पराग, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री. साहेबराव बेंदगुडे, कृषि विकास अधिकारी

(१६) डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१७) श्री. संजयकुमार राठोड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्री. सत्यवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१९) श्री. हे. सु.पाठक, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(२०) श्रीमती रुपाली कोळी, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(२१) श्री. टी. एस. देवकर, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(२२) श्री. विलास भागवत, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

(२३) श्री. डी. बी. घुगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर

(२४) श्री. आर. आर. जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा

(२५) श्रीमती रंजना कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर

(२६) श्री. जी. व्ही. बैरागी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माढा

(२७) श्री. प्रविण सिनारे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट

(२८) श्रीमती अर्चना वाघमळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला

(२९) श्री. प्रमोद काळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी

(३०) श्री. बाळासाहेब ढवळे-पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा

(३१) श्री. अजिंक्य टोळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ

(३२) श्री. प्रशांतसिंह मरोड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर

(३३) श्री. एस. अे. मारकड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सोलापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २९ जानेवारी २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :-**

(१) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(२) डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(३) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

(४) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बाल विकास विभाग

(५) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. र. आ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(७) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(८) श्री. कि. पां. वडते, उप सचिव, महसूल व वन विभाग

(९) डॉ. विजय कुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

**जिल्हा परिषद, सोलापूर :-**

(१) श्री. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. पी. एम. राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. महेश अवताडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. चंचल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(६) श्री. विजय लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. एस. एम. बनसोडे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग -१

(८) श्री. संजयकुमार राठोड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(९) श्री. एस. एस. कटकधोंड, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१०) श्री. गिरी देवदत्त, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(११) श्री. पी. आर. माने, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग - २

(१२) डॉ. सी. बी. देवेज्ञ, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सह सचिव, महिला व बाल विकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, महसूल व वन विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ३० जानेवारी २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :-**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(३) श्री. आर. व्ही. पानसे, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग

(४) श्री. विकास कदम, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग

(५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग.

**जिल्हा परिषद, सोलापूर :-**

(१) श्री. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

(२) डॉ. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. पी. एस. राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. देवदत्त गिरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(५) श्री. म. ज. अवताडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. पी. आर. माने, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)

(७) श्री. व्ही. डी. लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(८) डॉ. सी. बी. दैवज्ञ, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ४ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत सव्विसाव्या व सत्ताविसाव्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई